“पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रिक नर्सिंग” हा १२ महिन्याचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी अध्ययन रजा मंजूर करणेबाबत...

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन ज्ञापन क्र. : अध्यर २०१८/प्र.क्र.५६/१८/परिचर्या
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार (७ वा मजला),
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
दिनांक : १९ एप्रिल २०१८

वाचा :- **१)** वित्त विभाग, शासन निर्णय क्र. सेनिवे/१००१/१३०/सेवा-४, दि. २.६.२००३
२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्र. संवैशिवसं/एनयुआर/ डिप्लोमासायकॅट्रिक/अध्ययनरजा/३/ई/२०१७/१२१२५-८९,दि. ०६.११.२०१७

ज्ञापन :-

म.ना.से. (रजा) नियम, १९८१ मधील नियम ८० ते ८३ मध्ये शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्य क्षेत्राशी प्रत्यक्ष व निकट संबंध असलेल्या व्यवसाय विषयातील अथवा तांत्रिक विषयातील उच्च शिक्षण अथवा विशेषीकृत प्रशिक्षण अंतर्भूत असलेला विशेष पाठ्यक्रम भारतामध्ये वा भारताबाहेर पूर्ण करण्यासाठी लोकसेवेची निकड लक्षात घेऊन अध्ययन रजा मंजूर करण्याची तरतूद आहे.

२. तद्नुसार क्षेत्रीय कार्यालयातील तसेच त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वर नमूद केलेल्या क्षेत्राशी निगडीत अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी अध्ययन रजा मंजूर करण्याचे अधिकार शासनास असल्याने, सदर अभ्यासक्रम चालू होण्यापूर्वी आगाऊ वेळेत यथायोग्य प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करुन त्या अनुषंगाने यथोचित शासन ज्ञापन निर्गमित होणे क्रमप्राप्त आहे.

३. तद्नुसार, संचालक यांचे पत्र दिनांक २३.०६.२०१७ अन्वये **“पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रिक (नर्सिंग)”** या अभ्यासक्रमासाठी श्री.सायमन चार्लस डोलारे, अधिपरिचारक, श्री.छ.शि.म.सर्वो.रूग्णालय,सोलापूर यांना विषयांकीत अभ्यासक्रमास प्रवेश अर्ज भरण्यास संचालनालयाच्या स्तरावरुन परवानगी देण्यात आली असून, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता १२ महिन्याचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी “महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे” या संस्थेने निवड केलेली आहे. सदर अभ्यासक्रमास प्रवेशित होण्यासाठी श्री.सायमन चार्लस डोलारे, अधिपरिचारक, श्री.छ.शि.म.सर्वो.रूग्णालय,सोलापूर यांना अध्ययन रजा मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

४. “पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रिक (नर्सिंग)” या पदविका अभ्यासक्रमातील प्रशिक्षित झालेल्या उमेदवारांची शासनास असलेली निकड, सदर उमेदवाराने निवड केलेला अभ्यासक्रम

(कालावधी १२ महिने), उमेदवाराचे वय, सदर लोकसेवक तथा अधिपरिचारिका यांनी धारण केलेल्या ज्ञानाचे अद्यावतीकरण, संवर्धन व विकास करण्यास प्रोत्साहन देणे इ. बाबी लक्षात घेता व कर्मचाऱ्यांची शासन सेवा पाच वर्षापेक्षा जास्त झाली आहे, अशा अटीवर खालील तक्त्यात नमूद केलेल्या कर्मचाऱ्यास म.ना.से. रजा नियम, १९८१ मधील नियम ८१ मधील तरतुदीनुसार **"पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रिक (नर्सिंग)"** या विषयातील पदविका अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे १२ महिन्यांच्या कालावधीकरिता अध्ययन रजेस या शासन ज्ञापनाद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	जन्मतारिख	नियुक्तीचा दिनांक	सेवानिवृत्तीचा दिनांक	अध्ययन रजेचा कालावधी
१.	श्री.सायमन चार्लस डोलारे, श्री.छ.शि.म.सर्वो.रू,सोलापूर	०१.०४.१९९१	२५.०२.२०१२	३१.०३.२०४९	दि.१५.०८.२०१७ ते दि.१४.०८.२०१८

५. वर नमूद केलेल्या कर्मचाऱ्यांनी यांनी निवड केलेला **"पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रिक (नर्सिंग)"** या अभ्यासक्रमासाठी अध्ययन रजा मंजूरीच्या प्रयोजनार्थ म.ना.से. नियम १९७९ नमुना ७, नियम ८३ मधील निर्धारित तरतूदीनुसार समुचित कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालनार्थ अहवाल शासनास अवगत करावा.

हे ज्ञापन वित्त विभागाच्या दिनांक ०२.०६.२००३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय प्रमुखास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०४१९१३२४२८७०१३ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MAHAJAN HEMANT ANANT

Digitally signed by MAHAJAN HEMANT ANANT
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drug Department, postalCode=400001, st=Maharashtra, 2.5.4.20=18b72890e049ba3219e993bae40e4fae87fba16fd8c92cbf7f96107d9c100ae1, serialNumber=4146b85aaa58555e80c9d75a2aba23b993e46df208b0b469f1b74670dc22d7fa, cn=MAHAJAN HEMANT ANANT
Date: 2018.04.19 17:14:55 +05'30'

(हेमंत महाजन)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल १ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२. सचिव (सेवा-६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४. अधिदान व कोषागार कार्यालय, मुंबई,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, सोलापूर,
६. श्री.सायमन चार्लस डोलारे, अधिष्ठाता,श्री.छ.शि.म.सर्वो रूग्णालय, सोलापूर यांचे मार्फत,
७. निवडनस्ती (परिचर्या).